# विभागीय चौकशी संगणक आज्ञावली - DE Module (Departmental Enquiry Module)

राज्य शासकीय सेवकांविरुध्दच्या (गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/कर्मचारी) शिस्तभंगविषयक प्रकरणांच्या संनियंत्रणासाठी DE Module ही संगणक आज्ञावली सामान्य प्रशासन विभागाने NIC च्या सहकार्याने सन २०२२ मध्ये विकसित केली असून, ही आज्ञावली eHRMS ला संलग्न करण्यात (Integrate) आली आहे.

या संगणक आज्ञावलीत शासकीय कर्मचाऱ्यांविरुध्दच्या विभागीय चौकशी, निलंबन, फौजदारी प्रकरणांतील अभियोगास मंजूरी इ. प्रकरणांची माहिती नोंदविण्यात येते. याकरीता "विभागीय चौकशी" हा विषय हाताळणाऱ्या सर्व संबंधित कार्यासने/कार्यालये यांना DE Module चे युझर आयडी उपलब्ध करण्यात आले आहेत.

**DE Module चे उद्दिष्ट:-**

- **राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांविरुध्द सुरु असलेल्या शिस्तभंगविषयक सर्व प्रकरणांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करणे.**
- **प्रलंबित प्रकरणांचे संनियंत्रण व होणारा विलंब कमी करणे.**
- **राज्यातील शिस्तभंगविषयक प्रकरणांचा ऑनलाईन डेटा तयार करणे (Digitization of DE Records)**
- **विभागीय चौकशीचे जास्तीत जास्त कामकाज ऑनलाईन पध्दतीने करणे.**

**DE Module ची ठळक वैशिष्ट्ये :-**

- प्रत्येक वापरकर्त्या (User) कार्यालयाकडील शिस्तभंगविषयक प्रकरणांचा कायमस्वरुपी अभिलेख तयार (Create) करणे.
- शासकीय सेवकांची ना-चौकशी प्रमाणपत्रे (Vigilance Certificate) मिळवणे.
- शिस्तभंगविषयक प्रकरणांसंदर्भातील संबंधित नियम व आदेश (MCS Rules & GR) यांचे अद्ययावत संकलन वापरकर्त्यास PDF स्वरुपात उपलब्ध करणे
- निलंबित शासकीय सेवकांच्या प्रकरणांची अद्ययावत माहिती मिळविणे.
- चौकशी अधिकाऱ्यांचे Dash Board.

**DE Module मधून प्राप्त होणारे अहवाल (Reports):-**

वापरकर्त्या (User) कार्यालयास/विभागास पुढीलप्रमाणे विविध प्रकारचे अहवाल DE Module मधून मिळवता येतात:-

- एकूण प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणे व त्यातील अपचाऱ्यांची/सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या,
- प्रलंबित प्रकरणांच्या यादया- महसुली विभागनिहाय, जिल्हानिहाय, चौकशी अधिकारीनिहाय, लिंगनिहाय, इ.
- एकूण प्रकरणांपैकी **जबर व किरकोळ शिक्षेच्या प्रकरणांची विगतवारी**.
- निलंबनाधीन कर्मचाऱ्यांची संख्या, निलंबनाचा कालावधी इ. माहिती मिळेल.
- प्रकरणांचा कालावधी इ.

*-*-*-*